# संत ज्ञानेश्वर आणि पर्यावरण

**प्रा.डॉ.म. ई. तंगावार**
मराठी विभाग, श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर-४१३५१७

महाराष्ट्रात सातशे वर्षांपूर्वी पर्यावरण या विषयाकडे संत किती सूक्ष्मपणे पाहत होते याचे एक उत्तम उदाहरण म्हणून वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वरांच्या साहित्याकडे पाहता येईल. पर्यावरण संदर्भात मध्ययुगीन काळात संतांनी विविध अंगाने मांडणी करून उपदेशकाची भूमिका पार पडली. दुर्दैव असे की, ते आपण वाचायला आणि स्वीकारायला तयार नाही. संत ज्ञानेश्वरांनी पर्यावरणातील घटकांचे जितके बारकाईने आणि विस्ताराने चिंतन केले तितके आधुनिक काळात अभ्यासकांनी केलेले दिसून येत नाही. संत ज्ञानेश्वर म्हणतात की,

"नगरेचि रचावी, जळाशये निर्मावी।
महावने लावावी, नानाविधे।"

महाराष्ट्र सरकारने १ जुलै २०१६ रोजी दोन कोटी झाडे लावण्याचा निर्धार केला होता. संस्थेला सक्तीचे देखील केले होते. परंतु हा विचार तळमळीने सातशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी मांडलेला आहे प्राचीन काळात लोक जिथे पाणी आहे तिथे लोक वस्ती करत असत. शहर वसल्यानंतर पाणी साठविण्यासाठी तळ्याची आवश्यकता आहे. तळे, विहिरी या मानवनिर्मित संपत्ती आहेत. वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावावी त्याशिवाय जीवन सुखी नाही असा संदेश संत ज्ञानेश्वर देतात. 'नानाविध' या शब्दासंदर्भत टीप लिहितान गजानन खोले लिहितात, "या ओवीतील 'नानाविध' हा शब्द माऊलीने पर्यावणाचा विचार करता अतिशय सूचक वापरला आहे. एकाच प्रकारच्या झाडांच्या बागा लावल्या आणि ती झाडे संभाव्य रोगाला प्रतिकार करणारी नसली, तर ती सर्वच्या सर्व कोडग्रस्त होतात. वेगवेगळ्या प्रकाच्या झाडांमधील अशी प्रतिकार शक्ती ही वेगवेगळी असते. तेव्हा कीड किंवा रोग पडला तरी सगळी झाडे नष्ट पावू नयेत, या मागील माऊलींचा दृष्टिकोन संभवतो."[१] संत ज्ञानेश्वरांची ही दूरदृष्टी आजही प्रासंगिक वाटते. त्यामुळे संत साहित्य अजर, अमर आणि अक्षर आहे. वृक्षाशी संवाद साधता येतो मात्र ती दृष्टी असावी लागते. यासाठी डोळे असून चालत नाहीत. आधुनिक कवी बालकवी निसर्गकवी म्हणून ओळखले जातात. निसर्गातील सौंदर्य या कवीने प्रतिभेच्या आणि निरीक्षणाच्या जोरावर उलगडून दाखविले. हा आशय संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यात वाचायला मिळतो. ते म्हणतात की,

"झाडासि साजणे चाळावेगा।"[२]

झाडाशी मैत्री करून बोलण्यासाठी ती संवेदना असणे महत्त्वाचे आहे. एकंदरीत झाडावर भरभरून प्रेम कावे हेच संत ज्ञानेश्वरांना या ओवीतून सूचवाचयं होतं. मैत्रीमध्ये आपुलकीची भावना असते. मित्र म्हणून निसर्गाला स्विकारल्यानंतर त्याची हानी आपल्या हातून होत नाही ना! वृक्ष हा आपल्या कुटुंबापैकीच एक आहे असं प्रत्येकाला वाटायला हवं तरच वृक्ष टिकतील. झाड केवळ

माणसालाच नाही तर पशू-पक्ष्यांना देखील संतुष्ट करते असे ज्ञानेश्वरांना वाटते. त्यांनी एका ओवीत म्हटले आहे की,

"वसंत तेथे वने वने तेथे सुमने
सुमनी पालिंगने। सारंगाची।।"[३]

वसंत ऋतुत झाडांना नवी पालवी फुटत असते. त्यानंतर कळी आणि फुलात रुपांत होते. जिथे फुलं असतात तिथे भ्रमर गुंजत आस्वाद घेतात. पक्षांचे नाते देखील निसर्गाशीच आहे. झाडाशिवाय पक्षी जगू शकत नाहीत. कारण झाड हेच पक्षांचे सर्वस्व आहे. याचाही विचार माणसांनी करायला हवा. पशु-पक्ष्यांचं जगणं देखील माणसांच्या आचरणावर अवलंबून आहे असा महत्त्वाचा विचार माऊली सांगून जातात.

पाण्याशिवाय झाड टिकू आणि वाढू शकत नाही. संकल्प करून केवळ झाड लावून चालत नाही; तर त्या झाडाला सातत्याने पाणी देखील टाकले पाहिजे. यासंबंधी संत ज्ञानेश्वर लिहितात,

"पाहें पां शाखा पल्लव वृक्षाचे
हे काय नव्हती एकाचि बीजाचे
परी पाणी घेणे मुळाचे
ते मुळीची घापे।।"[४]

झाडाचं बीज महत्त्वाचं असतं. कारण बीजापासूनच फांद्या जन्म घेत असतात. झाडांच्या फांद्या, पाने, फुले, फळे एकाच बीजापासून उत्पन्न होतात. पाणी हे मुळाचे काम आहे. त्यामुळे मुळांना पाणी घालावे असा उपदेश संत ज्ञानेश्वर करतात. फुले, फळे, पाणी यांच्यातील ताजेपणास झाडाच्या मुळा कारणीभूत असतात. वृक्ष निःस्वार्थ भावनेने जगतात. तसेच वृक्ष नम्र असतात. फळ लागल्यानंतर वृक्ष ताठ मानेने राहत नाहीत. ते जमिनीकडे झुकतात. ज्ञान आणि संपत्तीच्या जोरावर माणसामध्ये अहंकार निर्माण होता कामा नये. ते इतरांच्या उपयोगी व्हावे असे ज्ञानेश्वरांना यातून सूचित करावयाचे आहे. वृक्ष आणि वेली या स्वतःसाठी नाही; तर दुसऱ्यांसाठी जगतात. आपल्याला आलेल्या फळांचा त्याग करतात. सर्वांनाच फळ देताना भेदभाव करीत नाही.

"जो खांडावया घावो घाली
का लावणी जयाने केली
दोघा एकाचि साऊली
वृक्ष दे जैसा।।"[५]

वृक्ष स्थितप्रज्ञ असतात. हे देखील ज्ञानेश्वर अशा ओवीतून सांगून जातात. मित्रावर आणि शत्रुवर प्रेम करणे हे झाडाचे वैशिष्ट्य होय. दोन्ही स्वभावांच्या माणसांना झाड सावली देतं. समाजात अनेक माणसं उपयोगाचे नसतात. त्यांचं जगणं भूमीला भार असते. माणसाच्या मृत्यूनंतर तर त्याच्या शरीराचा काही उपयोग नाही. झाडं वांझ गेली तरी कुठल्या तरी कामाला येतात. संत ज्ञानेश्वर लिहितात,

"जैशी चंदनागे निसळे। न फळताहि निफळे
होतीचि ना।।"[६]

चंदनाचे झाड फळले नाही तरी निष्फळ ठरत नाही. या झाडांना सुवासासाठी फुले येईपर्यंत थांबण्याची आवश्यकता नाही. संत ज्ञानेश्वर म्हणतात की, चंदनाच्या झाडाचे सर्व भाग सुगंधित असतात. एकंदरीत निसर्गातील कुठल्याही घटकाचे मूल्यमापन शब्दात करता येत नाही. माणसांबद्दल मात्र असे म्हणता येत नाही.

निसर्ग किंवा नैसर्गिकता जेथे संपते तेथे प्रदूषण जन्माला येत असते म्हणून निसर्गावर संतांची निसीम श्रद्धा होती. वृक्षापासून अनेक गोष्टी माणसाला मिळतात उदा. सावली, फुले, फळे, इंधन, साहित्य इत्यादी असे असतानाही कृतज्ञतेच्या भावनेतून आपण वृक्षाकडे पाहत नाही. याविषयीची खंत संत ज्ञानेश्वरांनी जागोजागी आपल्या साहित्यातून व्यक्त केली आहे.

पूर्वी आंबराई मोठ्या प्रमाणात होती. अनेक लोक तिथे विसावा घेत असत. अशा ठिकाणी थांबल्यानंतर जो आनंद होतो त्याची तुलना कशाशीही करता येत नाही. कारण असे ठिकाण रम्य व शांत असते. यासंबंधी संत ज्ञानेश्वर लिहितात,

"ऐसे न राहतयाते राहवी।
भ्रमतयाते वैसवी।।"[७]

निसर्ग पाहिल्यानंतर भटकणाऱ्या माणसालाही वाटते की, आपण येथे बसावे. नैसर्गिक वातावरण मन प्रसन्न ठेवते हे सांगताना संत ज्ञानेश्वर वनाचे महत्त्व विशद करून जातात. पाणी हे अमृतासमान आहे. यासंबंधी ज्ञानेश्वरीत अनेक संदर्भ आलेले आहेत. पाण्याचे गुण प्रेरणादायी आहेत. ते आत्मसात कायला हवे.

"पैगा वोघुचि वाकुडा।
परि पाणी उजू सुहाडा।।"[८]

नदीचा प्रवाह वाकडा असला तरी पाणी कडू नसते. ते पाणी माणसाच्या उपयोगाचेच असते. पाण्यामध्ये त्यागाची भावना आहे. आपण इतरांसाठी आहोत याच भावनेने पाण्याची वाटचाल असते. तहान लागलेल्या माणसांना आणि प्राण्यांना तहान भागविण्यासाठी पाण्याचा जन्म झाला आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. पशू-पक्ष्यांसाठी ज्या गवताची आवश्यकता आहे ते गवत वाढविणे आणि टिकविणे हे पाण्याच्या हातात आहे. स्वत: नष्ट होवून मृत अवस्थेतल्या गवताचे रक्षण करणाऱ्या पाण्याविषयी संत ज्ञानेश्वर लिहितात,

"पै जगी जीवन सारिखे। वस्तु अंगवरी उपखे
परी जाते जीवित राखे। तृणचि हि।"[९]

एखाद्याला मदत करायला, वाचावयास गेल्यानंतर परत येवू नये. शेवटपर्यंत प्रयत्न करावे. हा गुण आपण पाण्यापासून घ्यायला हवा हे सांगताना माऊली म्हणतात,

"पातले या झाडाचे मूळ। मागुते सरो नेणेचिजळ

जिराले का केवळ। तयाचाचि आंगी।"[१०]

पाण्याचा एक महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे पाणी झाडाच्या मुळाजवळ गेल्यानंतर परत येत नाही. ते त्या वृक्षाच्या मुळाशी प्रवृत्त करीत असते पाण्यापेक्षा इतर पदार्थ महाग असले तरी त्यावर माणसाला जगता येत नाही. माणसाला आणि इतर सजीवाला पाणीच जगवते. इतर पदार्थाचा फायदा नाही. पाण्यापेक्षा तूप महाग आहे. पण तुपामुळे पोट भरत नाही. तुपात इतरही गुण असले तरी पाण्याशिवाय पर्याय नाही. पाण्यातल्या तुपापेक्षा पाणी महत्त्वाचे आहे.

"अगा पाणियाहु नि बहु वे। तुपी गुण कीर आहे
परी मीना काय होये। असणे तेथे।"[११]

विश्वात पाणी आणि आई पवित्र आहेत. आई सर्व चुका सामावून घेते तसे पाणी देखील सर्वांना सामावून घेते. भारत कृषीप्रधान देश आहे. शेतीला पाण्याशिवाय पर्याय नाही. पाण्यामुळे शेती समृद्ध होते म्हणजेच धान्य पिकते. या अर्थानेही पाण्याचे मोल संत ज्ञानेश्वर आपणास सांगून जातात. यासंबंधी संत ज्ञानेश्वरांचे विवेचन ज्ञानेश्वरीत आले आहे. वाहणारे नदीचे पाणी अनेकांचे जीवन समृद्ध करते. त्यामुळेच पाणी हेच जीवन आहे असे म्हटले जाते.

**संदर्भ**

१) गजानन शं. खोले, ज्ञानदेवांच्या वनश्रीतील पर्यावरण, श्री ज्ञानेश आश्रम व अंधशिक्षण संस्था, आळंदी देवाची, १९९५ पृ.५१
२) तत्रैव, पृ.३४
३) तत्रैव, पृ.५२
४) रा.शं. नगरकर (संपा.) संत सुभाषित कोश, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११ पृ.२२०
५) तत्रैव, पृ.२२०
६) तत्रैव, पृ.२२२
७) रामचंद्र देखणे, संत साहित्यातील पर्यावरण विचार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, आ.दु.२००४ पृ.४१
८) उ.नि., रा.शं. नगरकर, पृ.७३
९) तत्रैव, पृ.७४
१०) तत्रैव, पृ.७४
११) तत्रैव, पृ.७५

**संत ज्ञानेश्वर आणि पर्यावरण**
**प्रा.डॉ.म. ई. तंगावार**